**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ३७/२०२५ मधील निशाणी १ वरील आदेश**

**(सचिन नाईक वगैरे वि. कोणीही नाही)**

**सीएनआरनं.एमएचएसआय–०५–०००३९९२०२५**

१. प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मुंबई नियंत्रण अधिनियम, १८२७ चे कलम २ व ८ अन्वये त्यांचे नावे मयत सुरेश अनंत नाईक **(यापुढे "मयत सुरेश" असा उल्लेख)** यांचे वारस म्हणून वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जदारांचे थोडक्यात कथन असे की, प्रस्तुतकामी अर्जदार क्र. १ व ३ यांचे वडील व अर्जदार क्र. २ यांचे पती सुरेश हे दि.१८/०८/२०२५ रोजी उभादांडा भेंडमळा येथे आपल्या राहत्या घरी अल्पशा आजाराने मयत झाले आहेत. मयत सुरेश यांना अर्जदार क्र. १ ते ३ हे कायदेशीर वारस असून त्यांच्या व्यतिरिक्त त्यांना इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत सुरेश यांच्या नावे वाहन असून सदर वाहन अर्जदार क्र. ३ यांच्या नावे हस्तांतरीत करण्याकरीता लेखी अर्ज देवून विचारणा केली असता उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सिंधुदुर्ग यांनी वारस प्रमाणपत्र दाखल करणेस त्यांना लेखी कळविले. सबब, मयत सुरेश यांच्या मालकीचे सदर वाहन अर्जदार क्र. ३ यांच्या नावे हस्तांतरीत होण्याकरीता ते वारस असलेबाबतचे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे याकरीता अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे व अर्ज मंजूर करण्याची विनंती केली आहे.

३. अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या व्यतिरिक्त मयत सुरेश यांचे दुसरे कोणी वारस आहे किंवा नाही हे जाणून घेण्याकरीता प्रस्तुतकामी अर्जदार यांच्यावतीने दि.१०/१२/२०२५ रोजी "दैनिक प्रहार" या वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात आली आहे. तसेच जाहीरनामा प्रसिध्द केल्याबाबतचा बेलिफ यांनी नि.क्र.०६ व नि.क्र.११ प्रमाणे अहवाल दाखल केला असून सदर अहवालानुसार वेंगुर्ला तहसील कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर, उभादांडा ग्रामपंचायत यांच्या नोटीस बोर्डावर, दिवाणी न्यायालय क. स्तर, वेंगुर्ला यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर व मयताच्या घरावर लावून जाहीरनामा जाहीर केल्याचे दिसून येते.

४. अर्जदार यांचे नावे वारस प्रमाणपत्र देण्याचा अर्ज व सोबत दाखल कागदपत्रे यावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण होतात व त्यावरील निष्कर्ष पुढील प्रमाणे आहेत.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत सुरेश यांचे वारस म्हणून त्यांच्या नावे वारस प्रमाणपत्र मिळविण्यास पात्र आहेत | होय. |

| | | |
|---|---|---|
| | का ? | |
| २ | आदेश काय ? | अर्ज अंशत: मंजूर करणेत येतो. |

५. सदर अर्जाच्या पृष्ट्यर्थ अर्जदार यांनी अर्जदार क्र. १ सचिन सुरेश नाईक यांचे सरतपासाचे शपथपत्र निशाणी १२ येथे दाखल केले आहे. अर्जदार यांनी कागदोपत्री पुरावा म्हणून वाहनांचे नोंदणी प्रमाणपत्र (नि.४/१), उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सिधुदुर्ग यांचे कार्यालयाकडून परवाना क्रमांक 6807/MH07/2002 चे परमीटची मूळप्रत (नि.४/२), विमा पॉलिसीची छायाकिंत प्रत (नि.४/३), उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सिंधुदुर्ग यांचे कार्यालयाकडून मिळालेली कर पावतीची छायाकिंत प्रत (नि.४/४), वाहनाचे पी.यु.सी. प्रमाणपत्राची मूळप्रत (नि.४/५), मयत सुरेश यांच्या मृत्यूदाखल्या छायांकित प्रत (नि.४/६), उपप्रादेशिक परिवहन कार्यालय सिंधुदुर्ग यांनी सक्षम न्यायालयाचा वारस दाखला हजर करण्यासंबंधीचे दिलेले पत्र (नि.४/७), दि.१०/१२/२०२५ रोजी "दैनिक प्रहार" या वर्तमापत्रामध्ये जाहीर प्रगटन प्रसिध्द केले होते ते वर्तमानपत्र (नि.१०) व मयत सुरेश यांच्या मृत्यूपुर्वीच त्यांची आई लक्ष्मी ही मयत असल्याबाबत पुरशीस (नि.१४) इ. कागदपत्रे स्कॅन करुन दाखल केलेली आहेत. जाहीरनामा प्रसिध्द केल्याबाबतचा बेलिफ अहवाल नि.क्र.०६ व नि.क्र.११ येथे दाखल आहे. तसेच अर्जदार यांनी प्रस्तुतकामी ज्यादा पुरावा देण्याचा नाही अशी नि. क्र.१३ वर पुरसीस दाखल करुन या कामी पुरावा बंद केला आहे.

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दे क्र. १ व २ करीता :-</u>**

६. अर्जदार यांनी अर्जातील कथनांचे पृष्टयर्थ व त्यांचे नावे वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरीता अर्जदार क्र.१ सचिन यांचे सरतपासाचे शपथपत्र नि.क्र.१२ वर दाखल केले आहे. सदर शपथपत्रातील कथनानुसार सुरेश हे दिनांक १८/०८/२०२५ रोजी गाव मौजे -उभादांडा, भेंडमळा, ता.वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथे मयत झालेले आहेत. मयत सुरेश यांच्या पश्चात त्यांना अर्जदार क्र. १ ते ३ हेच सरळ व कायदेशीर वारस हयात असून त्यांच्या व्यतिरिक्त त्यांना अन्य कोणीही वारस नाही.

७. सदर प्रकरणात "दैनिक प्रहार" या वर्तमानपत्रात जाहीर नोटीस तसेच जाहीर प्रगटन बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्द करुन हरकती मागविण्यात आलेल्या होत्या, परंतु सदर नोटीस व

जाहीरनामा प्रसिध्द झाल्यानंतर मुदतीत अर्जदार क्र. १ ते ३ यांना वारसाप्रमाणपत्र देण्याबाबत कोणीही हरकत नोंदविली नाही. तसेच प्रस्तुतकामी अर्जदार क्र. १ ते ३ यांच्याव्यतिरिक्त अन्य कोणीही मयत सुरेश यांचे वारस असल्याबाबत अथवा अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत सुरेश यांचे वारस नसल्याबाबतचा आक्षेप नोंदविलेला नाही. अर्जदार क्र. १ श्री.सचिन यांचा शपथेवरील जबाब व प्रकरणातील कागदपत्रे ही प्रस्तुत प्रकरणात कोणीही आक्षेप घेतला नसल्यामुळे शाबीत झालेली आहेत. अभिलेखावरील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, सुरेश यांचा दिनांक १८/०८/२०२५ रोजी मृत्यू झालेला आहे. तसेच अर्जदार क्र. १ सचिन यांच्या अर्जातील कथने व दाखल कागदोपत्री पुराव्यावरुन अर्जदार क्र. १ ते ३ हे मयत सचिन यांचे वारस असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येते. मुंबई नियंत्रण अधिनियम, १८२७ अंतर्गत दाखल प्रकरणामध्ये देण्यात येणारे वारसा प्रमाणपत्र हे वारस या स्थितीची औपचारीक ओळख (Formal Recognition) म्हणून देण्यात येते. प्रस्तुतकामी वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणाचीही हरकत नसल्यामुळे प्रस्तुतचा अर्ज अंशत: मंजूर होण्यास पात्र आहे व वरील सर्व कारणास्तव अर्जदार क्र. १ ते ३ यांना वरील कायद्यांतर्गत वारसा प्रमाणपत्र देणे न्यायाच्या दृष्टीने उचित आहे. करीता मी मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष होकारार्थी नोंदवित आहे व मुद्दा क्र. २ करीता खालील प्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशत: मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र. १ सचिन सुरेश नाईक, अर्जदार क्र. २ सुप्रिया सुरेश नाईक व अर्जदार क्र. ३ संकेत सुरेश नाईक यांचे वारस ही औपचारीक ओळख म्हणून सदर वारस प्रमाणपत्र अर्जदार क्र. १ ते ३ यांच्या नावे योग्य ते न्यायालयीन शुल्क आकारुन देण्यात यावे.

३. वारस प्रमाणपत्रावर दिवाणी नियम पुस्तिका परिच्छेद ३१२ मधील नमूद निर्देशांची नोंद घेण्यात यावी.

(सदरचा आदेश खुल्या न्यायालयात घोषीत केला.)

SOURABH JAYKUMAR CHIVATE
Digitally signed by SOURABH JAYKUMAR CHIVATE
Date: 2026.07.10 17:09:39 +0530

स्थळ – वेंगुर्ला
दिनांक –१०/०७/२०२६

**(एस.जे. चिवटे)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर वेंगुर्ला.